# बोदवड महाविद्यालय रासेयोद्वारा गरीब विद्यार्थ्यांना शालेयसाहित्य वाटप

(01.01.2020) कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथिल प्राचार्य अरविंद चौधरी व रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ चेतनकुमार शर्मा यांनी आर्थिक मदतीतून रासेयो दत्तकगाव हरणखेड येथील गरीब विद्यार्थ्यांना नववर्षानिमित्त गावातील 30 विद्यार्थ्यांना शाळेचा गणवेश, मोजे व बूट वाटप केले सदर साहित्य रासेयो विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना कपडे घालून, त्याच्या पायात मोजे व बूट घालून ग्रामस्थ व पालकांच्या साक्षीने वाटप केले

या उपक्रमाचे संस्थेचे चेअरमन मा मिठुलालजी अग्रवाल, व्हा चेअरमन मा अजयजी जैन, सचिव मा विकासजी कोटेचा व सर्व सचालक,उपप्राचार्य डी एस पाटील यांनी कौतुक केले

रासेयो विशेष हिवाळी

दि 26 डिसें 2019 रोजी हरणखेड येथे शिबिराच्या उदघाटन कार्यक्रमाच्या दिवशी सदर विद्यार्थ्यांना बिना शर्ट व बिना चपलानी बाजूला उभे असताना निदर्शनास आले या विद्यार्थ्यांना कशी मदत करता येईल या संदर्भात रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ चेतन शर्मा यांचेशी चर्चा करून 30 विद्यार्थ्यांना थंडीचे दिवस असल्याने शाळेचा पोशाख, मोजे,बूट देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती प्राचार्य यांनी दिली








